# संगमेश्वर कॉलेजचा बारावीचा निकाल ९२.८१ टक्के

## कला शाखा ८३.३३% ,वाणिज्य ९४.०४%, विज्ञान ९८.२२%

## वाणिज्य शाखेची केतकी कोकाटे कॉलेजमधून सर्वप्रथम

संगमेश्वर ज्युनिअर कॉलेज ,सोलापूरचा बारावीचा निकाल ९२.८१ टक्के इतका लागला. शाखा निहाय निकालाची टक्केवारी पुढीप्रमाणे - कला शाखा ८३.३३, वाणिज्य ९४.०४, विज्ञान ९८.२२ टक्के इतका लागला. वाणिज्य शाखेची केतकी कोकाटे कॉलेजमधून सर्वप्रथम आणि वाणिज्य विभागातून प्रथम आली. तर कला शाखेतून पर्जन्या अंजुटगी ९२.६७ (प्रथम) कॉलेजमधून पहिली आली. विज्ञान शाखेतून अथर्व कुलकर्णी (९२.६७) याने प्रथम येण्याचा मान मिळवला.

**✷ निकाल याप्रमाणे -**

- **कला शाखेचा निकाल : ८३.३३ %**

पर्जन्या अंजुटगी - ९२.६७ % (प्रथम)
दीपा सालोटगीमठ - ८३.८३ % (द्वितीय)
समर्थ भंडारे - ८३.८३ % (द्वितीय)
मेहेक नदाफ - ८३.३३ % (तृतिय)

- **वाणिज्य शाखेचा निकाल : ९४.०४ %**

केतकी कोकाटे - ९३.१७ % (प्रथम)
सुजित आगलावे - ९१.३३ % (द्वितीय)
अथर्व अदोने - ८८.८३ % (तृतिय)

- **विज्ञान शाखेचा निकाल : ९८.२२%**

अथर्व कुलकर्णी - ९२.६७ % (प्रथम)
तनया अक्कलकोटे - ९१.५० % (द्वितीय)
प्रियांका बटगिरे - ९१.३३ % (तृतिय)



या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. दीपक भंडारे, वेदश्री कुलकर्णी श्रीकांत अंजूटगी या पालकानी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आपले आईबाबा, कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, भाषा समन्वय प्रा. शिवराज पाटील, विज्ञान शाखा समन्वक प्रा. रामराव राठोड, वाणिज्य समन्वयक प्रा. बसय्या हणमगाव यांनी कला शाखा समन्वयक प्रा. शिवशरण दुलंगे यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापकवृंद, कर्मचारी आदींनी अभिनंदन केले. यंदाच्या वर्षी पुणे जिल्ह्यापेक्षा सोलापूर जिल्ह्याचा निकाल अव्वल लागला. यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गणेश मुडेगावकर यांनी केले तर पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे यांनी सर्वांचे आभार मानले.